एकाकी पदाच्या आरक्षणाबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक, क्रमांक- बीसीसी १०९३/३१८७/प्रक्र. १७१/९३/१६-ब,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- २७ फेब्रुवारी १९९४.

पहा :- १] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी १०७८/१८१०/२६३/१६-ब, दिनांक १.३.१९८९.

२] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी १०८८/१८१०/२६३/१६-ब, दिनांक १५.९.१९८९.

## परिपत्रक

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: बीसीसी १०८८/१८१०/२६३/१६-ब, दिनांक १.३.१९८९ अन्वये ज्या संवर्गात फक्त एकच पद [Isolated Post] असेल तेव्हा त्या एका पदास किंवा त्या पदासंदर्भात भविष्यात निर्माण होणारी रिक्त जागा यास आरक्षण लागू होणार नाही व ते पद बिनराखीव म्हणून समजण्यात यावे असे आदेश निर्गमित करण्यात आले होते. तदनंतर शासन परिपत्रक, क्रमांक : बीसीसी १०८८/१८१०/२६३/१६-ब, दिनांक १५.९.१९८९ अन्वये वर नमूद केलेल्या आदेशांना पुढील आदेश होईपर्यन्त तात्पुरती स्थगिती देण्यात आली होती. दरम्यानच्या कालावधीत एकाकी पदाच्या आरक्षणासंबंधी बरीच प्रकरणे न्यायालयात दाखल करण्यात आली. व बहुतेक प्रकरणी न्यायालयाने एकाकी पदास आरक्षण लागू करता येणार नाही असे निर्णय दिलेले आहेत. तसेच याचिका क्रमांक ३३८१/९१, श्री. लोखंडे विरुध्द महाराष्ट्र शासनाच्या संदर्भात औरंगाबाद खंडपीठाने याचिकेची सुनावणी होईपर्यन्त /अंतिम निर्णय लागेपर्यन्त शासन परिपत्रक, क्रमांक : बीसीसी १०८८/१८१०/२६३/१६-ब, दिनांक १५.९.१९८९ अन्वये एकाकी पदास आरक्षण लागू करण्याबाबत निर्गमित केलेल्या या आदेशास स्थगिती दिलेली आहे. वर विषद केलेल्या सर्व बाबी विचारात घेऊन शासन आता असे आदेश देत आहे की, फक्त एकच पद [ Isolated Post ] असलेल्या संवर्गात सुरुवातीच्या अथवा त्यापुढील भरतीवर्षात भरती/बढती बाबतचे आरक्षण लागू होणार नाही. म्हणजेच हे आदेश निर्गमित केल्यानंतर ज्या ज्या कर्मचाऱ्यांना एकाकी पदांवर नेमणूका दिल्या जातील, त्या तात्पुरत्या स्वरुपात तर असतील शिवाय त्या जेष्ठता व गुणवत्तेनुसार तसेच त्या औरंगाबाद खंडपीठाच्या याचिका क्रमांक ३३८१/९१ च्या निर्णयाच्या अधीन राहून दिल्या जातील.

...कृ.मा.प.

सर्व नियुक्ती अधिका-यांनी मागासवर्गीयांकरिता भरतीच्या त्याचप्रमाणे पदोन्नतीच्या वेळी पदे राखून ठेवण्यासंबंधीच्या विविध आदेशांची अंमलबजावणी करताना वरील आदेश लक्षात घेऊन कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अ. तु. वाघमारे

[ अ. तु. वाघमारे]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* आयुक्त, अनुसूचित जाती/जमाती, नवी दिल्ली,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग.
* सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
संचालक, समाजकल्याण, पुणे
संचालक, आदिवासी विकास नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
सर्व जिल्हा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी प्रकल्प,
-सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील इतर सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख

* पत्राने.

---